## ▌आदरांजली ▌

# डॉ. द. ना. धनागरे



श्रुती
तांबे

७ मार्चच्या संध्याकाळी ४.३० ला फोन वाजला. मी चटकन नाव वाचून नेहमीसारखं म्हटलं, 'नमस्कार सर, श्रुती बोलतेय-' तर धनागरे सरांच्या सूनबाई - ही इज नो मोर- म्हणाल्या, तेव्हा सुन्नच झाले! आत्ता ह्या रविवारी सकाळीच त्यांच्याशी फोनवर बोलणं झालं होतं. त्याआधी दोन दिवस आधी आम्ही भेटून त्यांच्या आगामी पुस्तकांची आखणी करत होतो. आजारातून ते लवकरच बरे होतील आणि कामाला लागतील असं त्यांच्या उत्साहावरून वाटत होतं. गेल्या दोन आठवड्यात विभागात आलेल्या अनेक नामांकित अभ्यागत प्राध्यापकांना भेटायला त्यांच्याकडे घेऊन गेले होते. तेव्हा निर्मळ उत्साहानं त्यांनी साग्रसंगीत चौकशी करून संशोधन, अध्यापन, सध्याचा त्यांना न आवडणारा सवंगपणा यावर ते सविस्तरपणे बोलत होते.

आणि आज त्यांच्या निधनाची वार्ता कळली! एक विद्यार्थिनी, अध्यापक, संशोधक म्हणून मी आणि समाजशास्त्रानं काय गमावलं याचा विचार करते आहे. स्वातंत्र्योत्तर काळातील भारतीय समाजशास्त्रातले महत्त्वाचे समाजशास्त्रज्ञ प्रा. द. ना. धनागरे यांच्या निधनानं सामाजिक शास्त्रातील एक व्यासंगी संशोधक, शिस्तप्रिय प्रशासक, तळमळीचा शिक्षक व परखड सामाजिक भाष्यकार हरपला आहे.

वाशीम ते ससेक्स व्हाया नागपूर हा प्रवास असो किंवा अमेरिकेतील एमआयटीतलं अध्ययन त्यांच्या आठवणी खूप ताज्या होत्या. इंग्लंडमध्ये टॉम बॉटोमोर यांच्यासारख्या गुरुच्या मार्गदर्शनाखाली झालेलं संशोधन, कानपूर-आग्रा येथील आयआयटीमध्ये केलेलं अध्यापन यांतून मिळालेलं संचित घेऊन ते तेव्हाच्या पुणे विद्यापीठात ते आले होते.

कानपूर आयआयटीतून पुणे विद्यापीठाच्या समाजशास्त्र विभागात प्राध्यापक म्हणून रुजू झाल्यावर त्यांनी ऐतिहासिक पद्धत वापरून केलेल्या

ईमेल : pwatsaru@yahoo.com

संशोधनामुळे पुणे विद्यापीठातील समाजशास्त्र विभागाला नवी दिशा मिळाली. मार्क्सवादी सिद्धांत वापरून त्यांनी केलेले भारतीय कृषक् आंदोलनांवरील संशोधन आजही अकादमिक अध्ययनातील मैलाचा दगड मानलं जातं.

मला विद्यार्थीदशेपासून त्यांचं मार्गदर्शन लाभलं– जवळजवळ ३० वर्षं. त्यांच्यामुळे मला भारतीय समाजशास्त्राचा मौखिक इतिहास जाणून घेता आलाच पण त्यासोबत जागतिक समाजशास्त्राचा पटही उलगडला. हाडाचा शिक्षक म्हणून त्यांची ख्याती होती. गेल्या ३० वर्षात त्यांच्याकडून. विद्यार्थ्यांच्या अनेक पिढ्या संशोधनातील शिस्त व व्यासंगाशी तडजोड न करता त्यांनी घडवल्या. भारतभर त्यांचे विद्यार्थी पसरलेले आहेत आणि त्यांच्या व्यासंगी संशोधनाचा वारसा पुढे चालवत आहेत. वरवर करड्या शिस्तीचे वाटणारे सर जवळच्या विद्यार्थांना मात्र कायमच त्यांचं स्नेहशील, अगत्यशील वडीलधारी व्यक्ती असे रूप अनुभवाला येत असे.

शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू म्हणून केलेल्या कार्यातून उच्च शिक्षणाविषयीची त्यांची व्यापक मतं त्यांनी पुस्तक रूपानं सूत्रबद्ध केली. भारतीय समाजशास्त्राला त्यांनी संस्थात्मक योगदान दिलं. मराठी समाजशास्त्र परिषदेचं अध्यक्षपद, भारतीय समाजशास्त्र परिषदेचं अध्यक्षपद या पदांचा सन्मान यांनी वाढवला.

सामाजिक आंदोलनांचं समाजशास्त्र, समाजशास्त्राचा अभ्यासविषय व व्याप्ती, कुळांच्या व छोट्या शेतकऱ्यांच्या चळवळी, पर्यावरणऱ्हास, विकासाचा विपरित अर्थ यावर ते सातत्याने लिहित राहिले. अलीकडे त्यांचं दीर्घकालीन संशोधनावर आधारित 'शरद जोशी व शेतकरी संघटना' यावरील पुस्तक खूप गाजलं.

गेल्या वीस वर्षांत मी त्यांच्या तीन दीर्घ मुलाखती घेतल्या. एक पुणे आकाशवाणी केंद्रासाठी, दुसरी पुणे दूरदर्शनसाठी अशा जाहीर मुलाखती आणि तिसरी हिंदीतील 'समीक्षा' नियतकालिकासाठी. त्यानिमित्तानं वारंवार संवाद झाला. कटकमध्ये त्यांना भारतीय समाजशास्त्र परिषदेचा जीवनगौरव पुरस्कार मिळाला, त्यावेळी जगन्नाथ पुरी, कोणार्क असा प्रवास आम्ही काहींनी त्यांच्यासोबत केला, त्या संस्मरणीय आठवणी आहेत. तसाच लाल बसने एम. ए.च्या दुसऱ्या वर्षात असताना आम्हा निवडक विद्यार्थांना घेऊन सरांनी माळशिरसला मासूम संस्थेचं काम दाखवायला विद्यापीठीय निधीची वाट न बघता स्वखर्चानं नेलं होतं, तेही आठवतं.

आमची माणूस म्हणून, स्वतंत्र व्यक्ती म्हणून आणि समाजशास्त्राचे अभ्यासक म्हणून जडणघडण करणाऱ्या आमच्या व्यासंगी सरांना विनम्र आदरांजली!!

●

---

**(अर्चना माने / ६४ वरून)**

मराठीच्या डिग्रीची आवश्यकता नाही...

सर माझी भूगोलाची आवड आजही कायम आहे... त्या विषयातल मी खूप काही वाचत असते... आणि तरीही मी एम.ए.नंतर पत्रकारितेची मास्टर डिग्री घेतली... कारण मला माझा पिंड समजला होता. हो सर माझं व्यक्त होण्याचे माध्यम मी घट्ट पकडून ठेवले म्हणूनच आज मी या दुनियेत तग धरू शकले... मी मला ओळखू शकले... आणि मला जिवंत ही ठेवू शकले... अन्यथा या जगाच्या दुनियादारीत कुठल्या कुठे पाचोळ्यासारखी उडून गेले असते!!

सर माझ्या थरथरत्या आवाजात मी सांगितलेल्या नुसत्या कवितेतून तुम्ही माझ्यासारख्या सामान्य मुलीची पारख केली होती... आणि पुढच्या दोन वर्षात माझ्या लेखनाच्या जडणघडणीला योग्य दिशा दिली होती... स्मिताने माझ्या माघारी कविता वाचनासाठी माझे नाव नोंदविले नसते... तुम्ही मला आपल्या भाषणातून माझ्या कवितेची नव्याने ओळख करून दिली नसती... तो दिवस जर माझ्या आयुष्यात उजाडला नसता... तर... सर विचारही करवत नाही मला...

सर काल तुम्ही गेलात... रात्री फार उशिरा समजली मला ती वाईट बातमी... अशा पद्धतीनं तुमचं जाणं... एखादे दुस्वप्न वाटतयं... विश्वासच बसत नाहीये....खूप अस्वस्थ व्हायला झालंय सर... बरेच दिवस झाले सर... तुम्हाला एक गोष्ट सांगायची होती...खूप साधी होती... पण का कुणास ठावूक मला सांगताच आली नाही... आणि ती अशा पद्धतीने सांगावी लागेल असेही कधी वाटले नाही... सर... सर मला थँक्यू म्हणायचे होते... थँक्यू म्हणायचे होते सर तुम्हाला...

●